**प्रेसनोट** दि.३१/१०/२०१७

**दि.३१/१०/२०१७ रोजी सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा सेवानिवृत्ती सत्कार समारंभ**

दर महिन्याला नियत वयोमानानुसार जे पोलीस अधिकारी व कर्मचारी सेवा निवृत्त होतात. आज दि.३१/१०/२०१७ रोजी पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील एकुण **सहा** पोलीस अधिकारी व कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत मा. श्रीमती.रश्मि शुक्ला,पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे हस्ते सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार समारंभ त्यांचे कुटुंबियासह आयोजीत केला होता. त्या प्रसंगी मा.सह पोलीस आयुक्त, श्री.रविंद्र कदम,मा.अपर पोलीस आयुक्त, (प्रशासन),श्री.साहेबराव पाटील, मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे, श्री.प्रदिप देशपांडे हे हजर होते.

सदर वेळी मा.पोलीस आयुक्त,श्रीमती.रश्मि शुक्ला यांनी सर्व निवृत्त पोलीसांना अवाहन केले की,जर तुम्हांला छंद असल्यास खात्यातील नोकरीमुळे त्या छंदाचा विसर पडला असले तर तो पुन्हा जागृत करा, विशेष करुन आपल्या तब्येतीकडे लक्ष दया, ज्यांची इच्छा असले त्यांनी जेष्ठ नागरीक कक्षामध्ये सहभागी होवुन, आपल्या अनुभवाचा फायदा इतर जेष्ठ नागरीकांना व समाजाला होईल त्यामुळे तुम्ही जेष्ठ नागरी कक्षामध्ये सहभागी व्हावे. पोलीस खात्यामध्ये नोकरी करीत असताना, अडचणीमुळे आपल्याला पर्यटण करता आले नाही तरी आपण दुर दुर पर्यटण करावे,ज्या नातेवाईक, मित्रपरिवार यांना भेटता आले नाही त्यांना आता जरुर वेळ देवुन त्यांची भेट घ्या असे सांगितले. या समारंभा मध्ये सहा सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना शाल व श्रीफळ तसेच स्मृतिचिन्ह व निवृत्तीचे प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले आहे.

| अक्र | अधिकारी व कर्म. नांव | पद | नेमणूक |
|---|---|---|---|
| १. | सुरेश पांडुरंग भोसले | सहा.पोलीस आयुक्त | गुन्हे शाखा |
| २. | अशोक दामोदर जगताप | पोलीस फौजदार | गुन्हे शाखा |
| ३. | सुरेश सदाशिव सावंत | सहा.पोलीस फौजदार | चिंचवड पो स्टे |
| ४. | सतीश नरहर कुलकर्णी | सहा.पोलीस फौजदार | स्वारगेट पो स्टे |
| ५. | ज्ञानेश्वर नारायण माळी (स्वेच्छा सेवानिवृत्ती) | सहा.पोलीस फौजदार | नियंत्रण कक्ष |
| ६. | मॅन्युअल जॉन मुन्तोडे | सहा.पोलीस फौजदार | विशेष शाखा |

यातील **पाच** पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची पेन्शन तात्काळ मंजुर करण्यात आली आहे. उपरोक्त अधिकारी व कर्मचारी यांना व त्यांच्या कुटुंबियांना भावी आयुष्यातील वाटचालीबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय-२,श्री.शेषराव सुर्यवंशी यांनी प्रस्तावना व आभार प्रदर्शन करून,सदरचा कार्यक्रम पार पाडयासाठी विशेष भुमिका निभावली आहे.

या कार्यक्रमाचे फोटो crimepress.pune@gov.in व https://punepolice.co.in या मेल आयडी व वेबसाईटवर सोडले आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

